सं. फौ. ख. क्र. ४००/२०१६ निशाणी ४१

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – रवि सिताराम निंबाळकर

वय – ५८ वर्षे, व्यवसाय – पोलीस उपनिरीक्षक जी., पोलीस मुख्यालय, अकोला

पत्ता – बळवंत कॉलनी, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर. लोखंडे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. मी दि.२७.०५.२०१६ रोजी उरळ पो.स्टे. येथे स्टेशन डायरी अंमलदार म्हणून कार्यरत होतो. आमच्या पो.स्टे. चे हे.कॉ. श्री दादाराव लिखार यांनी लेखी रिपोर्ट दिला, त्यावरुन मी पोलीस ठाणेदार यांच्या आदेशाने जावेद खान गुलखान पठाण यांच्या विरुध्द जिवनावश्यक वस्तु अधिनियमचे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल केला. आता मला नि.क्र.३४ कडील छापील एफआयआर दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. बी. पी. उपर्वट यांचे मार्फत उलटतपासः**

२. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे ज्यावेळी लेखी फिर्याद दिली त्यावेळी मी घटनेची शहानिशा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादी लेखी फिर्याद पो.स्टे. ला येथे त्यावेळी त्याचा साना क्रमांक घेतला जातो व तो क्रमांक फिर्यादवर व छापील फिर्यादवर नमुद केला जातो. हे म्हणणे खरे आहे की, साना क्रमांक लेखी फिर्यादीवर नमुद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर गुन्ह्याची खोटी फिर्याद नोंदी. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– ०९.०२.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.02.09 16:33:14 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०९/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०९/०२/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०९/०२/२०२६ |